दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २२३ I मंगळवार २६ मे २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

**खरी भक्ती...** जोपर्यंत तुम्ही काही करता, तोपर्यंत त्याचं फळ तुम्ही देवावर टाकूच शकत नाही.सुर्याचा प्रकाश आहे,अकर्मात तो उभा आहे. वाहतोय प्रकाश. तो काही म्हणत नाही, मी काही करतो. म्हणून कोणी काही सूर्याला दहा शिव्या दिल्यात काय किंवा त्याचं वंदन केलं काय,हे सगळं एक सारखं. नदी वाहतेय, नदीला काही वाटत नाही कि मी वाहतेय की माझ्यातून पाणी वाहतंय, त्याच्यातून जीवन वाहतंय, कि लोकांना पाहिजे. ती आपली वाहतेय. सुकली तर लोक शिव्या देतील.ती काही करतच नाही. ती नुसतीच वाहतेय. जो काही करत नाही फक्त त्याच्या हातून घडत आहे, त्याचं आपोआपच ऑटोमॅटीकली त्याचं कार्य जे आहे ते परमेश्वरावर आहे. त्याचं फळ आणि कार्य सगळंच परमेश्वरावर असतं. तो जे काही करतो ते सगळंच परमेश्वराचं असतं. तो नुसता साक्षी बघत असतो. परमेश्वराच्या हातात जर मुळी खेळणं झालात तर तोच भक्त. मग त्याने उचललं काय, बसवलं काय, चुलीत घातलं काय, किंवा क्रुसावर टांगलं काय, काहीही केलं तरी ती भक्तीच! जे काही तो मनुष्य करेल ते सगळं परमेश्वराच्याच हातातलं खेळणं असल्यामुळे तो काही करतच नाही.त्याला जाणण्यासाठी 'आत्मसाक्षात्कार' हेच साधन आहे.



'सहजयोग'
भाग ६२

१६ सप्टेंबर १९७३,पुणे अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# तीन भीषण अपघातांनी महाराष्ट्र हादरला!

## रायगड, जुन्नर आणि धुळेतील अपघातांत १७ जणांचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रात रविवारी आणि सोमवारी घडलेल्या तीन भीषण अपघातांनी संपूर्ण राज्य हादरले. रायगडच्या आंबेनळी घाटात, जुन्नरमधील अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर आणि धुळे जिल्ह्यातील लळींग घाट परिसरात झालेल्या दुर्घटनांमध्ये एकूण १७ निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. अनेक जण गंभीर जखमी असून विविध रुग्णालयांत त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या सलग दुर्घटनांमुळे राज्यातील रस्ते सुरक्षा, घाट रस्त्यांवरील संरक्षक उपाययोजना आणि वाहतूक व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

### आंबेनळी घाटातील दुर्घटनेने महाराष्ट्र सुन्न


रायगड आणि सातारा जिल्ह्यांना जोडणाऱ्या आंबेनळी घाटात साताऱ्यातील आसगाव येथील तरुणांच्या स्कॉर्पिओ गाडीचा भीषण अपघात झाला. पोलादपूर-म हाबळेश्वर मार्गावरील धोकादायक वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने स्कॉर्पिओ तब्बल १००० ते १५०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात आठ तरुणांचा जागीच मृत्यू झाला. घाटात सुरक्षेसाठी मजबूत कठडे नसून केवळ मातीचे ढिगारे असल्याने वाहन थेट दरीत कोसळल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मृतांपैकी १ रत्नागिरी जिल्ह्यातील असून उर्वरित ७ हे सातारा जिल्ह्यातील आहेत. रायगड आणि सातारा पोलीस दल सुद्धा समन्वय ठेवून आहेत.

रितेश राजेंद्र लोखंडे वय २५ वर्षे (मृतदेह सापडला), महेश अनिल पवार वय २५ वर्षे, आदित्य अशोक साळुंखे वय वर्षे २१, सुहास जितेंद्र लोखंडे वय २० वर्षे५) अंश समीर चव्हाण वय १८, उत्कर्ष आनंद शिंगटे वय २१ वर्षे, अनिल अभिमन्यू शिंगटे वय २५, वर्षे, नितीन किसन नायकोंडे वय ३५ वर्षे.अपघातानंतर प्रशासनाने युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले असून एनडीआरएफसह स्वयंसेवी पथकांची मदत घेतली जात आहे. या घटनेमुळे घाटरस्त्यांवरील सुरक्षाव्यवस्थेबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

## धुळ्यात तिहेरी भीषण अपघात; बचावकार्य करणाऱ्याचाही मृत्यू

मुंबई-आग्रा महामार्गावरील धुळे जिल्ह्यातील लळींग घाट परिसरात डंपर, ट्रक आणि खाजगी ट्रॅव्हल्स बसमध्ये झालेल्या तिहेरी अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला, तर २६ जण गंभीर जखमी झाले. विशेष म्हणजे, आधी झालेल्या डंपर आणि ट्रकच्या अपघातानंतर मदतकार्य सुरू असतानाच भरधाव ट्रॅव्हल्स बसने घटनास्थळी जोरदार धडक दिली. यात बचावकार्य करणारा टोल कर्मचारीही चिरडला गेला.

या घटनेनंतर टोल कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली. अपघाताची भीषणता इतकी मोठी होती की महाम



ार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे विस्कळीत झाली होती.

रायगड, जुन्नर आणि धुळे येथे अवघ्या काही तासांत घडलेल्या या तिन्ही भीषण दुर्घटनांनी राज्यातील रस्ते सुरक्षेच्या दाव्याची पोलखोल केली आहे. घाटरस्त्यांवरील अपुरी सुरक्षा, भरधाव वाहने, धोकादायक वळणे, निष्काळजीपणा आणि अपुऱ्या उपाययोजना यामुळे निष्पाप नागरिकांचे जीव जात असल्याचे चित्र समोर आले आहे. सलग घडलेल्या या दुर्घटनांनंतर राज्य सरकार आणि प्रशासनाने तातडीने घाट रस्त्यांची सुरक्षा, महामार्गावरील नियंत्रण यंत्रणा आणि आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी आता केवळ घोषणांपेक्षा ठोस कृतीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## जुन्नरमध्ये एसटीची मोटारसायकलला धडक

अहिल्यानगर-कल्याण महामार्गावरील डिंगोरे गावाजवळ एसटी बस आणि मोटारसायकलमध्ये झालेल्या भीषण अपघातात चार तरुणांचा जागीच मृत्यू झाला. रविवारी रात्री घडलेल्या या दुर्घटनेत एकाच गावातील चौघा युवकांचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. जीवनदीप हॉटेलजवळ भरधाव एसटी बसने मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला.




खंडू नारायण भले (वय २५) आणि शिवराम नारायण पारधी (वय २६ रा. भलेवाडी, डिंगोरे, जुन्नर), दीपक सखाराम भले (वय २८) आणि आशिष ढवळू भले (वय २४, रा. मराडवाडी, डिंगोरे, जुन्नर) अशी मृत्युमुखी पडलेल्या तरुणांची नावे आहेत. विठ्ठल यशवंत भले (वय ५२, रा. आंबेदरा, डिंगोरे, ता. जुन्नर) यांनी फिर्याद दिली आहे. बसचालक नागेश बबन गुरव (वय ३५, रा. रा. गोरेगाव, अकोला) याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत जखमींना रुग्णालयात हलवले; मात्र डॉक्टरांनी चौघांनाही मृत घोषित केले. या प्रकरणी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# गळाभेटीच्या बहाण्याने गळा कापला..!

## शिवसेना उपजिल्हाप्रमुख अंबादास म्हस्के यांच्यावर जीवघेणा हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर शहरात शिवसेना उपजिल्हाप्रमुख अंबादास म्हस्के यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला. बाबा पेट्रोलपंप चौक परिसरात गळाभेटीच्या बहाण्याने आरोपीने त्यांच्या गळ्यावर चाकूने वार केला. या प्रकरणी क्रांती चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रविवारी रात्री उशिरा आरोपी राम बोडखे याने अंबादास म्हस्के यांना फोन करून भेटण्यासाठी बोलावले होते. त्यानंतर बाबा पेट्रोलपंप चौकात भेट झाल्यानंतर 'मजाक करत होतो' असे म्हणत आरोपीने गळाभेट घेत अचानक चाकूने गळ्यावर वार केल्याची तक्रार पोलिसांत देण्यात आली आहे. गंभीर जखमी अवस्थेत म्हस्के यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, आरोपी राम बोडखे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे.



गंभीर जखमी अवस्थेत म्हस्के यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.दरम्यान, आरोपी राम बोडखे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे,अशी माहिती पोलीस निरीक्षक सुनील माने यांनी दिली आहे.

## अहिल्यानगर पोलीस मुख्यालयात प्रशिक्षणादरम्यान हँडग्रेनेडचा स्फोट, ४ जवान जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या प्रशिक्षणादरम्यान अत्यंत धक्कादायक दुर्घटना घडली आहे. मॉक ड्रिल दरम्यान हाताळणीचे प्रशिक्षण दिले जात असताना एका हँडग्रेनेडचा हातातच भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत.आज सकाळी १० वाजेच्या सुमारास ही घटना घडली. यामुळे पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कर्मचाऱ्यांना हँडग्रेनेड कसा हाताळावा याबाबत प्रात्यक्षिकासह माहिती दिली जात होती. त्याचवेळी अचानक हँडग्रेनेडचा हातातच स्फोट झाला.या दुर्दैवी घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. यापैकी दोघांच्या हाताच्या बोटांच्या चिंधड्या उडाल्या आहेत. तर इतर दोन कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत.

घटनेनंतर संपूर्ण पोलीस मुख्यालयात एकच पळापळ आणि गोंधळ उडाला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सर्व जखमी कर्मचाऱ्यांना तातडीने जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांनी सांगितले की, हा स्फोट स्मोक हँडग्रेनेड फुटल्यामुळे झाला आहे. जमाव पांगवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या या ग्रेनेडची पिन काढल्यानंतर संबंधित जवानांकडून लिव्हर सुटल्याने हा अपघाती स्फोट झाला. या घटनेमुळे पोलीस वर्तुळातून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

# देशातील पहिला 'पाण्याचा सातबारा' महाराष्ट्रात

## पाण्याचे तीन टप्प्यात होणार ऑडिट : महसूलमंत्री बावनकुळेंचा निर्णय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासह जल व्यवस्थापन करण्यासाठी आता जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर 'पाण्याचा सातबारा' देशात



प्रथम महाराष्ट्रात विकसित करण्याचे नियोजन सुरु करण्यात आले आहे. विकसित महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येणार आहे. यासाठी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाची तयारी सुरु केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत आज मंत्रालयातील बैठकीत यावर सविस्तर चर्चा केली.

जलव्यवस्थापन करणाऱ्या ' अक्वेरियम 'या संस्थेने यासाठी 'वॉटर ऑडिट' आणि 'बॅलन्सशीट'ची संकल्पना मांडली असून, ही अभिनव योजना राज्यात सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. सध्या सर्वत्र जमिनीच्या नोंदीसाठी 'सातबारा' उतारा अस्तित्वात आहे, मात्र पाण्यासाठी अशी कोणतीही नोंद प्रणाली नाही. पाण्याला जागतिक स्तरावर जो मान आणि दर्जा मिळायला हवा, तो सध्या मिळत नाही. एकदा पाण्याचे ऑडीट झाले की, त्याचा वापर कसा करायचा याबाबत काळजी घेतली जाईल. जोपर्यंत पाण्याचा वापर रेकॉर्ड केला जात नाही, तोपर्यंत त्यावर नियंत्रण राहणार नाही आणि लोकांची पाण्याचा वापर करण्याबाबतची जबाबदारीही निश्चित होणार नाही. याच उद्देशाने 'ब्लू ग्रीन अर्बन डेव्हलपमेंट'च्या धर्तीवर हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येत आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी अक्वेरियमचे प्रमुख डॉ. सुब्रमन्यम कंसूर, जलाभ्यासक डॉ. अविनाश कदम आणि उदय नायर यांनी एकत्रितपणे 'वॉटर अकाऊंटिंग फ्रेमवर्क' आणि 'वॉटर बॅलन्सशीट'ची अद्ययावत संकल्पना विकसित केली आहे. या अंतर्गत पाण्याचे तीन टप्प्यांत ऑडिट केले जाणार असून, त्याचे दरवर्षी वर्गीकरण केले जाईल. या प्रणालीमुळे ग्रामपंचायत किंवा पाणलोट क्षेत्रातील पाण्याचा साठा, आवक, जावक आणि शिल्लक पाणी याचा पारदर्शक ताळेबंद ठेवता येईल.

या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे केवळ पाण्याचे मोजमाप होणार नाही, तर पाण्याचे संवर्धन करणाऱ्यांना 'अक्वाक्रेडिट्स' च्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाईल. यामुळे ग्रामीण भागात पाण्याचा वापर अधिक जबाबदारीने आणि पारदर्शकपणे होईल, व भविष्यात एक मोठी 'वॉटर इकॉनॉमी' उभी राहण्यास मदत मिळेल. महाराष्ट्र राज्य हा प्रयोग राबविणारे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

## महत्त्वाचे..

### सीजेपी विषयाला इतके भावूक होऊन पाहू नका : सरन्यायाधीश सूर्यकांत




नवी दिल्ली : 'कॉक्रोच जनता पार्टी' (सीजेपी)च्या उपक्रमांची आणि बोगस वकिलांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. या याचिकेवर भाष्य करताना सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी याचिकाकर्त्यांच्या वकिलांना म्हटलं आहे की, 'या प्रकरणात इतके भावुक होण्याची आवश्यकता नाही.' दरम्यान, या याचिकेत न्यायालयात होणाऱ्या सुनावणीदरम्यानच्या तोंडी टिप्पण्यांचा व्यावसायिक आणि प्रसिद्धीसाठी गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, बनावट पदव्यांच्या आधारे वकिली करणाऱ्या खोट्या वकिलांची चौकशी करण्याची मागणीही यात आहे.

## विकास लवांडे यांना जामीन नको; पोलिसांची मागणी : वारीपूर्वी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** वारकरी संप्रदायाविषयी वादग्रस्त व्यक्तव्य केल्याप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना जामीन देण्यास पुणे पोलिसांनी सोमवारी न्यायालयात विरोध केला.

लवांडे तक्रारदार, साक्षीदारांवर दबाव टाकू शकतात; तसेच आषाढी एकादशीनिमित्त आगामी वारी सोहळ्याच्या काळात अशा वक्तव्याची पुनरावृत्ती झाल्यास कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी कारणे देत वाघोली पोलिसांनी लवांडेंचा जामीन अर्ज **(पान ४ वर)**



# महाराष्ट्रातील ८ मान्यवरांचा दिल्लीत सन्मान

- **राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंच्याहस्ते पद्म पुरस्कार**
- **हेमा मालिनींच्या हाती स्व. धर्मेंद्र यांना पद्मविभूषण**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या 'पद्म पुरस्कारांचे' वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मानपूर्वक करण्यात आले. महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले.

राष्ट्रपती भवनातील 'गणतंत्र मंडप' येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन , पंतप्रधान नरेंद्र मोदी , केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच अन्य केंद्रीय मंत्री आणि म ान्यवर उपस्थित होते. आज पार पडलेल्या पहिल्या टप्प्यातील समारंभात महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना कला क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल मरणोत्तर 'पद्मविभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांच्या पत्नी व खासदार हेमा मालिनी यांनी स्वीकारला.

सहा दशकांहून अधिक काळ हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे धर्मेंद्र यांनी ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. गेल्या नोव्हेंबरमध्ये वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांचे निधन झाले होते. दोन मान्यवरांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात **(पान ४ वर)**



### गोडबोले दाम्पत्याला संयुक्त पद्मश्री

मूळचे पुण्याचे असलेले डॉ. रामचंद्र गोडबोले आणि डॉ. सुनीता गोडबोले या दाम्पत्याला संयुक्तपणे 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविण्यात आले. गेली ३५ वर्षे त्यांनी महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील बस्तर आणि अबू झमाडसारख्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागांत आरोग्य सेवा पोहोचवण्याचे कार्य केले आहे. 'ट्रस्ट फॉर हेल्थ'च्या माध्यमातून त्यांनी आदिवासी भागातील कुपोषण आणि बालमृत्यू कमी करण्यासाठी विशेष योगदान दिले असून, सुमारे एक लाख आदिवासींना मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे. त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले.